। न ही ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ।

'छत्रपती शिवाजी शिक्षण मंडळ वडूज' चे

# कला व वाणिज्य महाविद्यालय, वडूज



## मराठी विभाग

## क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले ग्रुप

### विषय : काव्यशास्त्र (कवयत्रींची मुलाखत)

| विद्यार्थ्यांची नावे | रोल नं. |
|---|---|
| १. नलवडे स्वप्नाली विलास | ५२१ |
| २. धडांबे प्रियांका विजय | ५१५ |
| ३. मांडवे श्रद्धा बापूराव | ५२० |
| ४. फडतरे मयुरी विठ्ठल | ५२५ |
| ५. वायकर प्रणाली सुरेश | ५३२ |

**पर्यवेक्षक**

प्रा. डॉ. सौ. केंजळे सविता

अधिव्याख्याती

कला व वाणिज्य महाविद्यालय, वडूज

शैक्षणिक वर्ष - २०१८-१९

Scanned with CamScanner

# प्रस्तावना

आम्हाला आमच्या विद्यापीठाच्या काव्यशास्त्र या विषयासाठी मुलाखत हा विषय केंजळे मॅडम यांनी दिला आहे आणि त्यांनी आम्हाला कवियीत्री ॲड. शुभदा एस. कुलकर्णी यांच्याबद्दल सुचविले आणि आम्ही मोबाईल नंबर घेतला, आम्ही त्यांना फोन केला आणि त्यांची मुलाखत घ्यायला परवानगी घेतली. त्यांनी आम्हाला गुरुवार दि. ०७/०३/२०१९ रोजी सकाळी ९.३० वाजाता बोलविले. आम्ही गुरुवारी सकाळी ९.३० वाजता त्यांच्या घरी गेलो. आमचे त्यांनी प्रथम स्वागत केले. आधी आम्ही त्यांना प्रश्नावली दिली. नंतर त्यांची मुलाखत घेतली. आम्ही त्यांची रेकॉर्ड द्वारे मुलाखत घेतली आणि त्यांनी आम्हाला चांगल्या प्रकारे प्रतिसाद दिला. त्यांची पिंपळपान आणि अवकाळीचा पाऊस ही दोन पुस्तके प्रसिध्द आहेत. आम्ही ही मुलाखत छापून घेतली.

Scanned with CamScanner



**१. तुमचा जन्म कोठे झाला व तुमचे बालपन कुठे गेले ?**

**जन्म :-**

जावळी तालुक्यात बुधगांवला झाला. जन्मानंतर फक्त ५-६ महिनेच मी त्या गावात राहिले. माझं पंजोळ होत ते, मी पंजोबांच्या घरी राहत होते.

**बालपन :-**

माझे बालपन वाई तालूक्यात पांडे या गावी झाले माझं माध्यतीक शिक्षण वाई येथे झाले आणि माझे कॉलेज सातारा येथे झालं मला वाचनाची आणि लिखानाची फारा आवड आहे. त्यामुळे मी T.Y. ला मराठी हाच विषय फार आवडीने ठेवला आणि त्यातच मी माझे कॉलेज पूर्ण केले. मी दहावी ला असताना मला जेव्हा निवंध लिहून आणायला सांगायचे तेव्हा मी माझ्या वडीलांकडून निबंध लिहून घ्यायचे आणि त्या निवंधाचे वर्गात सर्व कौतुक करायचे पण ते श्रेय फक्त माझ्या वडीलांचे होते. त्यामुळे मला खुप लाजल्या सारखे वाटायचे. मनात कुठतरी खूप वाईट वाटायच कि ते लिहून द्यायचे आणि श्रेय मला मिळायच हे काही

Scanned with CamScanner

बरोबर नाही. त्यामुळे मी ठरवल की जे काही करायचं ते स्वकर्तृत्वातून सुरुवात झाली. त्याचे प्रेरणास्थान म्हणजे माझे वडील मी दहावीला असताना पहिली कविता लिहीली ती म्हणजे.

काळोखाच्या काळ्या सागरात

डुंबते आहे दिनरात

तरी कोणी मारतो फटका

काळजासह नाही मारा

प्रकाशांचा उजेड

आपल्या आयुष्यात अंधार असतो पण कधीतरी त्याचा अर्थ कळतोच आपल्याला पण कुठेतरी प्रकाशाचा एक किरण दिसतो. आपल्याला आपल्या आयुष्यात आणि प्रत्येकाने अपेक्षा ठेवावी की हे ही दिवस बदलतील ही माझी पहिली कविता १९७२ ला प्रसिब्ध झाली. त्यावेळी मी कॉलेजला होते आणि त्यावेळी कॉलेजमध्ये एक मायबोली अंक होता. त्याच अंकामुळे माझी ही कविता प्रसिब्ध झाली. कॉलेजमध्ये मायबोली अंकात बऱ्याच कविता होत्या. पण फारश्या कोणालाही आवडल्या नव्हत्या, पण त्यात माझी एक छोटीशी कविता होती. ती सर्वांना आवडली. त्यामुळे मायबोली अंक गाजला नंतर पुढच्या वर्षी सरांनी सांगितले की मायबोली अंकात तुझ्याच कविता पाहीजेत आणि पुढच्या वर्षी माझी तीन पानांची कविता त्यांनी प्रसिब्ध केली आणि ती सर्वांना आवडली. प्रत्येकजण मला विचारायचे की तु असे काय लिहीलेस की आम्हाला वाचण्याची स्फुर्ती निर्माण होते.

Scanned with CamScanner

**२. तुमच्या आयुष्यात तुम्हाला कवितांसाठी प्रोत्साहन/ सहकार्य करणारी व्यक्ती कोण.**

डॉ. शि. रा. चव्हाण यांनी मला कॉलेजमध्ये असताना मला फार प्रोत्साहन दिले आणि माझे मित्र-मैत्रिणी त्यांनी मला फार सपोर्ट केला. आणि माझे प्रेरणास्थान असणारे माझे वडील त्यांनीसुद्धा मला फार पाठिंबा दिला. दहावीपासून निबंध लिहीण्याची कला पण मला अवगत झाली. ते एक शिक्षक होते. पहिल्यांदा तेच मला निबंध लिहून द्यायचे खरं तर त्यांच्या या निबंध लिहून देण्याच्या प्रेरणेतूनच मी स्वत:च अस लिखाण करु शकते. माझ्या कविता या आत्मपर अशा आहेत.


**३. तुम्हाला कोणत्या विषयावर लिखान करायला जास्त आवडते.**

खरं तर मला आत्मचरित्र यात मला फार रस आहे. तसेच सामाजिक थोड्या फक्षर कविता मी लिहिलेल्या आहेत. कवितांमधून मी स्वत:चा शोध घेणे हेच मी माझ उद्दिष्ट मानलं आहे. आता जर मला संधी मिळाली तर मी समाजावर पण लिखाण करु शकते. इतका मला आत्मविश्वास आहे. समाज आता पावलो पावली वदलतोय. तरी यावर मी लिहू शकते.

Scanned with CamScanner

४. तुमचे किती काव्यसंग्रह प्रसिध्द आहेत.

खर तरं त्यावेळी टी.व्ही. नव्हता. मोबाईल नव्हता. पण तेव्हा माझा दुरदर्शनवर माझा कार्यक्रम झाला होता. कवितांचा कार्यक्रम झाला होता. त्यावेळी एक सत्य कथा म्हणून दर्जेदार मासिक होत.




त्यात पण माझ्या काही कविता प्रसिध्द झाल्या होत्या. काही संपादकही मला पत्र पाठवायचे की तू खूप छान लिहीतेस आम्हालाही त्या कविता पाठवत जा. आम्ही प्रसिध्द करण्याचा प्रयत्न करु. पण त्यानंतर माझं लग्न झाल आणि दोन-तीन वर्षात हे सगळचं माझ्या हातातून सुटून गेल. मी संसार आणि मुलांमध्ये फार वाहून गेले. मुलं, संसार, कुटूंब, सासु, सासरे तसेच मी एक वकील आहे. यातून मला वेळ मिळालाच नाही, पण अलिकडे वॉट्सअॅप ग्रुपमुळे माझी पुस्तक प्रकाशित झाली.

Scanned with CamScanner

याच कारण म्हणजे माझे मित्र-मैत्रिणी त्यांच्याशी वॉट्सअॅपवर कॉन्टॅक्ट होवून त्यांच्या मदतीने माझी दोन पुस्तके प्रकाशित झाली. माझ पहिल पुस्तक पिंपळपान हे पहिले पुस्तक दि. १४ ऑगस्ट २०१६ या साली प्रसिध्द झाले, हे पुस्तक सौ. शितल जयंत लंगडे, अक्षरा पब्लिकेशन्स कुमार रेसिडेन्सी, ८७, शुक्रवार पेठ, सातारा येथे प्रसिध्द झाले आणि माझे दुसरे पुस्तक म्हणजे अवकाळीचा पाऊस हे सप्टेंबर २०१८ साली प्रसिध्द झाले. हे पुस्तक श्री. शशिकांत कुलकर्णी मु. पो. वडूज सुरुची, भाग्योदयनगर, वडूज ता. खटाव जि. सातारा येथे प्रसिध्द झाले, अशा प्रकारे माझे दोन काव्यसंग्रह प्रसिध्द झाले.

**५. तुम्ही एक गृहीणी आहात, वकिल आहात, आई आहात यासारख्यातून तुम्ही तुमच्या लिखाणास वेळ कसा काढता?**

मी माझ्या लिखानासाठी पहाटेची वेळ निवडते व उठते. आणि त्या काळात ४ ते ६ या वेळेत माझे लिखाणकाम पूर्ण करते. कुटूंब हे एक आपली जबाबदारी असते. त्यामुळे कुटूंबाला १ वेळ द्यावाच लागतो. माझ्या आयुष्यतली पहिली जबाबदारी माझे कुटूंब आहे. त्यामुळे कोणालाही दुःख वाटत नाही. ४ ते ६ लिखाण तिथून पुढे घरातली कामे, ११ ते ३ ऑफिस, पुढे कुटूंबासाठी वेळ अशा प्रकारे मी सगळ्यांसाठी वेळ काढला.

Scanned with CamScanner

**६. तुम्ही तुमच्या लिखाणातून समाजाला कोणता संदेश देऊ इच्छिता का?**

आयुष्य हे एक कोड आहे आणि ते आपल्याला सोडवायच लागत. आयुष्यात खुप झगडायचे आहे. तुम्ही झगडला तरचं तुम्हाला मार्ग मिळेल. कुठलेही संकट आल तरी खचून जावू नका, कारण सगळंच प्रयत्न वाया जातात असे नाही. एखाद्या तरी प्रयत्नाला यश मिळत. त्यामुळे सतत प्रयत्नशील रहा.

**७. तुमची सर्वांत आवडती कविता ऐकायला मिळेल का?**

गणित

माझे प्रत्येक सुखाचे गणित

तुझ्याशिवाय सुटणार नव्हते

आणि तुझ्या कुठल्याच सुखाच्या क्षणात

मी अपेक्षितच नव्हते.

ही माझी सगळ्यात आवडती कविता.

Scanned with CamScanner

**८. कवितांच्या क्षेत्रात काम करताना तुम्हाला चांगले वाईट अनुभव आले का?**

चांगले अनुभव :-

खुप कौतुक होत लोकांकडून, सगळे माझ्या साहित्याला नावाजतात. फार प्रेमाने माझी पुस्तके वाचतात. तसेच एक आदर्श म्हणून विद्यार्थी माझ्याकडे बघतात. हेच चांगले अनुभव आले, मला आजपर्यंत

वाईट अनुभव :-

पुस्तक प्रकाशन झाल्यावर फार वैयक्तिक प्रश्न विचारतात. ते मला अजिबात आवडत नाही. माझ्या प्रत्येक लिखाणा संबंध हा माझ्या वैयक्तिक आयुष्याशी कधीच येत नाही. माझ्या या कविता फक्त एक क्षण ---------- असतात. एक क्षणाचा जो अनुभव असतो तो माझ्या लिखाणात उतरते. त्यामुळे लोकांना वाटते तेच माझ आयुष्य आहे. पण असे काही नसते आणि ज्या माझ्या वैयक्तिक कविता असतात. त्या किती तरी जणांना आपल्याला वाटतात.

**९. तुमच्या लिखाणाचा समाजाला काय उपयोग झाला का?**

हो झालाय, माझ्या लिखाणाचा उपयोग झाला आहे. खुप लोकांना आत्महत्या करण्यापासून वाचवले आहे. मी त्यांना स्वत: समजावले त्यांची भेट

Scanned with CamScanner

होते. त्यांना खुप प्रेरणा देते. माझ्या बऱ्याचश्या मित्र मैत्रिणींना खुप सावरले आहे. तुमच्या कवितांवर तुमची काय प्रतिक्रीया?

माझ्या आत्ममग्न कविता आहेत. त्या विषयी लिखाण करायला आवडले. ते मी मनापासून लिहीते. समाजाच आपण देणे लागतो. त्यामुळे समाजावर लिहायला मला फारच आवडते.

**१०. तुम्ही कोणत्या विषयावर लिखाण करु इच्छिता?**

माझी एक इच्छा आहे की, मला एक कादंबरी लिहायची आहे. तसे विषय वरेच आहेत. कादंबरीसाठी पण मला माझ्या लिखाणासाठी अनुभवांची फार गरज आहे. पण ते अनुभव जरा कमी पडत आहेत. मला स्वत:च्या बळावर लिहायला आवडते आणि ती मी माझी ही लवकरच पूर्ण करेन.

**११. तुमची प्रकाशित झालेल्या २ पुस्तकांची नावे.**

माझे पहिले पुस्तक पिंपळपान हे दि. १४ ऑगस्ट २०१६ ला प्रकाशित झ ाले.

अवकाळीचा पाऊस हे माझे दुसरे पुस्तक दि.२ सप्टेंबर २०१८ रोजी प्रकाशित झाले.

अशा प्रकारे माझे २ काव्यसंग्रह प्रकाशित झाले आहेत.

Scanned with CamScanner

**१२. जर तुम्हाला लेखनाची संधी दिली तर कोणाच्या विषयावर लेखन करु इच्छिता?**

फार मोठ्या सामाजिक प्रश्नावर हात घालू मी इच्छित नाही. कारण माझा पिंड नाही तो प्रत्येकाच्या मर्यादा असतात आणि आपल्या मर्यादा जाणाव्यात. आणि आपल्या मर्यादा जाणाव्यात. आणि मलाही माझ्या मर्यादेचे भान आहे. त्यामुळे मी फक्त माझ्या स्वत:च्या अनुभवातुनच लिखाण इच्छिते. कारण आयुष्यासाठी अनुभवे फार महत्त्वाची असतात. त्यामुळे मी माझ लिखाण अनुभवातूनच इच्छिते. कारण अनुभवातुनच लिहिलेल आपल वाटत.

**१३. तुमच्या आयुष्यातली अशी एखादी व्यक्ती जिणे तुम्हाला पाठिंबा दिला?**

असे मला वकील आणि कवयित्री या क्षेत्रात सपोर्ट करणारे कोणी नाही. माझे मिस्टर फक्त मला घरगुती कामातचं फक्त मदत करतात. पण कविता त्यांना कळत नाही. त्यामुळे ते मला साहित्य कामात मदत करत नाही. मलापण फारसा काही अडचण नाही. कारण शेवटी त्यातले त्यांना काही समजत नाही. त्यामुळे त्यांना मला पाठिंबा नाही दिला तरी मला तो चालतो. कारण प्रत्येकाची आवड वेगळी असते. त्यामुळे मी त्यांच्यावर जबरदस्ती नाही करु शकत त्यांना मला पाठिंबा द्यावा, म्हणून प्रत्येक व्यक्तित सगळेच गुण असू नाही शकत. त्यामुळे ज्याला जे आवडते त्यातच स्वत:च कर्तृत्व सिध्द करावा. याची आपण सवय करुन

Scanned with CamScanner

घेतली पाहिजे. जर आपल्या नवऱ्याला त्यात आवड नसेल. पण माझ्या वडिलांनी मला लेखणाची आवड निर्माण करुन दिली. त्यामुळेच मी आज या टप्प्यावर आहे.

## १४. अजून तुम्ही तुमच्या कविता बद्दल काय बोलू इच्छिता?

जर माझ्या कवितातून समाजाला प्रेरणा मिळाली तर फारच चांगल आहे. त्याचा मला फारच अनंद होईल. मी कवितातून माझे मन मोकळे करते. तसे प्रत्येकाने आपल्याला आवडणाऱ्या गोष्टीतून निर्माण व्हावे. त्यामुळे आपण आपल्या



चुका सुधारु शकतो. आयुष्यात खुप अडचाण्‌ी येतात. पण त्यांना सामोरे जाण्याची ताकद आपल्यात असली पाहिजे. आयुष्याला सामोरे जाण्याचे खरचं हे सामर्थ्य असते. त्यामुळे माणसाने आयुष्यात नेहमी प्रयत्नशिल रहावे.

Scanned with CamScanner

## १५. तुम्ही तुमचे मनोगत व्यक्त करु शकता का?

वडिलांकडे असलेल्या सुंदर भाषा शैलीचा माझ्यात उतरलेला थोडाफार अंश, लाभलेले संवेदनाक्षम मन व निसर्गाशी जन्मापासून जडलेले नाते या सर्वांचा एकत्रित परिपाक म्हणजे माझ्या कविता. मानवी भाव भावनांचे अनेक कंगोरे वेळोवेळी गुंफले गेले आणि त्याची उकलही होत गेली व तेच माझ्या लेखणीतून उतरले ते कवितेच्या माध्यमातून.

या कवितांचे वर्गीकरण करण्याचा विचारही कधी माझ्या मनात आला नाही. ह्या प्रेमकविता नाहीत, विरहगिते नाहीत, निसर्गकविताही नाहीत. समरगिते तर अजिबात नाहीत.

परंतू हा केवळ शब्दाविष्कारही नाही तर ही ह्याला फक्त तात्कालिक पद्य प्रतिक्रिया मानते. त्यामुळे ह्या कवितांचे साहित्यिकमूल्य काय? असे जड प्रश्न डोक्यातही आणू नका. तरच तुम्हाला ह्या कविता भावतील अन्यथा नाही.

Scanned with CamScanner

# समारोप

आम्हाला आमच्या विद्यापीठाच्या काव्यशास्त्र या विषयासाठी मुलाखत हा विषय केंजळे मॅडम यांनी दिला. त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

आमच्या मार्गदर्शक शिक्षिका केंजळे मॅडम यांनी आम्हाला अॅड. कुलकर्णी मॅडम यांचे नाव सुचविले. आम्ही त्यांची रेकॉर्डद्वारे मुलाखत घेतली. त्यांनी आम्हाला खूप चांगल्या प्रकारे प्रतिसाद दिला.

आम्हाला हा प्रोजेक्ट करताना खूप आनंद झाला. कुलकर्णी मॅडम यांची मुलाखत घेतल्यानंतर आम्हाला खूप छान वाटले आणि प्रत्येकाने काहीतरी व्हावे. अशी इच्छा मनात निर्माण झाली.

त्यांनी आम्हाला मुलाखत खूप चांगल्या प्रकारे दिली. त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

Scanned with CamScanner